महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे 411 005


| DIVISINAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL -sscboardpune@gmail.com |
| --- | --- | --- |
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 25536712 (OFF) | |


क्र.पुविमं / यो.प्र. / 2026 / 10164
पुणे – 411005
दिनांक– 12/10/2026

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये
पुणे / अहिल्यानगर / सोलापूर

**विषय :– योग्यता प्रमाणपत्राबाबत...**
**संदर्भ** – क्र.रा.मं. / संशोधन / समकक्षता / 4009 दि.28 / 09 / 2026.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील मुख्याध्यापक / प्राचार्य यांना कळविण्यात येते की,

१. इ.11वी मध्येच इतर मंडळातुन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मंडळास सादर करून योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची कार्यवाही करावी. जे विद्यार्थी इ.12वी मध्ये आहेत व ज्यांचे योग्यता प्रमाणपत्राचे प्रस्ताव अद्याप पर्यंत सादर केलेले नाहीत, अशा सर्व विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मंडळास तात्काळ सादर करण्यात यावे.
२. ज्या विद्यार्थ्यांना इ.11वी मध्ये काही अपरिहार्य कारणामुळे योग्यता प्रमाणपत्र मिळाले नाही अथवा इतर मंडळातून विद्यार्थ्याने थेट इ.12वी मध्ये प्रवेश घेतला असेल अशा इ.12वी परीक्षेस प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्राकरीता पाठपुरावा करावा व योग्यता प्रमाणपत्र इ.12वी चे आवेदनपत्र भरण्याच्या अंतिम दिनांकाच्या आत प्राप्त करून घ्यावे.
३. जे विद्यार्थी मंडळाच्या समकक्षता यादीत नसलेल्या मंडळामार्फत इ.10वी परीक्षा उत्तीर्ण असेल तर त्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्राकरीता मंडळ कार्यालयात समक्ष येवून दिनांक 15 / 10 / 2026 पूर्वी प्रस्ताव सादर करावा.
४. इ.12वी परीक्षेची आवेदन पत्र भरतांना योग्यता प्रमाणपत्र क्रमांक भरणेची अट असल्याने संबंधित विद्यार्थ्यांचे आवेदन पत्र भरण्यापूर्वी योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे अनिवार्य आहे. योग्यता प्रमाणपत्र अभावी विद्यार्थ्यांना आवेदन पत्र भरता आले नाही तर किंवा चुकीचे नंबर भरून आवेदन पत्र सादर केले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालयाची / उच्च माध्यमिक शाळेची राहील यास मंडळ जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. परीक्षेच्या ऐनवेळी विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र / समकक्षता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर होणार नाही तसेच एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

MBRaut
(डॉ.मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ ,पुणे